सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 2315
दिनांक :- 17 AUG 2023

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- "मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम" योजनेची प्रभावी अमलबजावणी होण्याचे दृष्टीकोनातुन आपल्या विभागाच्या सहभागाबाबत.**

**संदर्भ :- १.** उद्योग संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक :- उसं/मुरोनिका/योजना सहभाग/२०२३/सो ९८९२ दिनांक ८/८/२०२३.
**२.**मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १६/आस्था/रोजगार/२०२३/२१५ दिनांक १७ ऑगष्ट २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सोबत **"मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम" योजनेची प्रभावी अमलबजावणी होण्याचे दृष्टीकोनातुन आपल्या संस्थेच्या सहभागाबाबतचे** उद्योग संचालनालय, मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्रमांक १ तसेच .मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्रमांक २ जोडलेले आहे कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(श्री. म.म. अंधारे)**
सहाय्यक संचालक (तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्रं. १६) यांना माहीतीकरीता सादर.
२.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट. http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/रोजगार/२०२३/ 2-95 दिनांक : 17 AUG 2023

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विभागाच्या सहभागाबाबत...

संदर्भ : उद्योग संचालनालय यांचे क्र. उसं/मुरोनिका/योजना सहभाग/२०२३/ सो ९८९२, दि.०८.०८.२०२३

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन, राज्यातील युवक/ युवतींसाठी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीला चालना व उद्योजकतेस प्रोत्साहन देवून सुक्ष्म उपमक्रम स्थापित करण्यासाठी "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम"(Chief Minister Employment Generation Programme CMEGP) योजनेची अंमलबजावणी उद्योग विभागांतर्गत करण्यात येत आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतंर्गत राज्याचे एकूण ३० हजार प्रकरणांचे उद्दीष्ट निश्चीत करण्यात आलेले असून शासनाकडून अनुदान वाटपासाठी रु.५४१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन असल्याचे संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर योजना ही राज्यातील युवक/ युवतींसाठी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीला चालना व उद्योजकतेस प्रोत्साहन देणारी असल्याने योजनेचा लाभ जास्तीत जास्त युवक-युवतींपर्यंत पोहोचण्यासाठी व त्यांना स्वयं रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहीत करण्यासाठी या संचालनालयाच्या अधिपत्याखालील तंत्रनिकेतन/ अभियांत्रिकी महाविद्यालय येथे विविध शाखांचे / अभ्यासक्रमांचे पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण/ प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे विविध रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार आपल्या अधिनस्त संस्थांमध्ये विभागीय कार्यालय स्तरावर व स्थानिक पातळीवर विविध रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे. तसेच सदर योजनेच्या माहितीसाठी व संपर्कासाठी उद्योग संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालय व जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयांचे संपर्क क्रमांक व ईमेल आय डी सोबत जोडण्यात आलेले आहेत. सदर योजनेची माहिती / माहिती पत्र आपल्या अधिपत्याखालील संस्थांना पाठविण्यात येवून जास्तीत जास्त युवक युवतींनी योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात यावेत.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# महाराष्ट्र शासन
## उद्योग संचालनालय

उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगूरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३१९०२ ई-मेल : di.cmegp@maharashtra.gov.in

क्र.उसं/मुरोनिका/योजना सहभाग/२०२३/ [illegible] ७९५१ दिनांक — 03 AUG 2023

प्रति,
मा. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
मुंबई.

**विषय :- "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विभागाच्या सहभागाबाबत.**

**संदर्भ** :- मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी दि. ०१.०८.२०२३ रोजी VC द्वारे दिलेले निर्देश.

महोदय,

राज्यातील युवक/युवतींसाठी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीला चालना व उद्योजकतेस प्रोत्साहन देऊन सुक्ष्म उपक्रम स्थापित करण्यासाठी **"मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम"(Chief Minister Employment Generation Programme-CMEGP)** योजनेची अंमलबजावणी उद्योग विभागातंर्गत करण्यात येत आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतंर्गत राज्याचे एकुण ३० हजार [illegible] प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले असून अनुदान वाटपासाठी रु. ५४२ कोटी इतका निधी [illegible] केलेला आहे.

आपल्या अधिपत्याखालील तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालय येथे विविध शाखांचे/अभ्यासक्रमांचे पदवीका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण/प्रशिक्षण युवक-युवतींना दिले जाते. सदर योजना ही राज्यातील युवक/युवतींसाठी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीला चालना व उद्योजकतेस प्रोत्साहन देणारी असल्याने योजनेचा लाभ जास्तीत-जास्त युवक-युवतींपर्यंत पोहोचण्यासाठी व त्यांना स्वयं रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहित करण्यासाठी आपल्या स्तरावर/स्थानिक पातळीवर विविध रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्याचे निर्देश द्यावेत.

सदर योजनेच्या माहितीसाठी व संपर्कासाठी उद्योग संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालय व जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयांचे संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. सदर योजनेची माहिती आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी माहिती पत्रकाची सॉफ्ट कॉफी ई-मेलद्वारे पाठविण्यात येत आहे. सदर योजनेची माहिती /माहिती पत्र आपल्या अधिपत्याखालील तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालय यांना पाठविण्यात येऊन योजनेचा लाभ जास्तीत- जास्त युवक-युवतींनी घेण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात यावेत, ही विनंती.

आपला विश्वासू,

( सदाशिव सुरवसे)
उद्योग सह संचालक (सीएमईजीपी)


Government of Maharashtra

महाराष्ट्र शासन

MAITRI

## आता घडेल
## नवा समृद्ध महाराष्ट्र!

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना
# CMEGP




राज्य शासनाच्या
भक्कम सहकार्याने तरुण/तरुणींना
उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सुक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देणेसाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होणेसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहिर केली आहे.





# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

# Chief Minister Employment Generation Programme (CMEGP)

## स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार !

### उद्देश :

- राज्यातील युवक/ युवतींच्या सर्जनशिलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सुक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होणेसाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

### पात्रता अटी :

- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करु इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/ जमाती/ महिला/ अपंग/ माजी सैनिक/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्यांक) ५ वर्षाची अट शिथिल.
- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.
- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या / महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.





### प्रकल्प मर्यादा किमत :

- प्रकिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा / कृषी पूरक उद्योग / व्यवसाय प्रकल्पांसाठी कमाल रु.२० लाख.

### योजना अंमलबजावणी यंत्रणा :

अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र
ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय
एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.



### पात्र मालकी घटक :

वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट, एकल मालकी कंपनी (OPC) व मर्यादित दायित्व संस्था (LLP).

प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :

| प्रवर्ग | स्वगुंतवणूक | अनुदान | | बँक कर्ज | | (मंजूर प्रकल्प किंमतीनुसार) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | |
| सर्वसाधारण | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% | |
| विशेष प्रवर्ग (अनुसूचित जाती/ जमाती/ महिला/ अपंग/ माजी सैनिक/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्यांक) | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% | |

## बँक/ वित्तीय संस्था यांचा सहभाग :

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वंय गुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरुपातील) आर्थिक सहाय्य याव्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५% टक्के अर्थसहाय्य बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेडयुल्ड बँका, खाजगी बँका व १४ जिल्हयांतील मध्यवर्ती सहकारी बँका इत्यादी मार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

## लाभार्थी निवड :



मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण: ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष CMEGP पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यांत येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजूरी व कर्ज मंजूरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजूरीच्या अनुषंगाने मंजूर प्रकल्प किंमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतूदीतून वितरीत होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्ष कालावधीसाठी LOCK-IN राहील. प्रकल्प यशस्वीरित्या अंमलबजावणी झाल्याची खात्री झाल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरीत होईल. संपूर्ण प्रकिया ही ऑनलाईन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.



## प्रशिक्षण :



योजनेंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी नि:शुल्क निवासी स्वरुपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासन मान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषी पूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तीमत्व विकसित होणारे, क्षमतावृध्दी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषय तज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

## सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे: (अ)

- जन्म दाखला/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / वयाचा पुरावा
- शैक्षणिक पात्रते संबंधिचे कागदपत्रे / प्रमाणपत्रे.
- आधार कार्ड
- नियोजित उद्योग / व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदारील प्राथमिक संमती), बँक मंजूरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल.
- जातीचे प्रमाणपत्र (एस.सी/ एस.टी.प्रवर्ग/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्यांक)
- विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक)
- वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना.
- स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे:

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाईन अर्ज सादर.



महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.



बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजूरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजूरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिनमनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजूरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँके द्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.



अर्जदारांनी स्वत:ची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजूर रक्कमेचे पूर्ण कर्ज वितरण.

प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

३ वर्ष प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

## उद्योग विभागामार्फत राबविण्यांत येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्वपूर्ण योजना/उपक्रम:-

१. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम
२. सुधारीत बीज भांडवल योजना.
३. जिल्हा उद्योग केंद्र योजना.
४. महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना.
५. केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना.
६. महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना.
७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती / जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना.
८. निवासी /अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम.
९. काथ्या (Coir) प्रोत्साहन योजना.
१०. औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९
११. माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योग क्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना
१२. उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने /दाखले ऑनलाईन उपलब्ध होणेसाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना
CMEGP






# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

महाराष्ट्र शासन

MAITRI

## धोरण रोजगार निर्मितीचे
## धोरण प्रगत महाराष्ट्राचे

१. उद्योजकतेस प्रोत्साहन देणारा व्यापकरोजगार निर्मितीला राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम

२. रु. ५० लाखांपर्यंतचे प्रकल्प योजनेंतर्गत पात्र

३. सेवा-उद्योग, कृषी पूरक तसेच उत्पादन प्रकारचे उद्योग/व्यवसाय पात्र

४. राज्य शासनाचे मार्जिन मनी अनुदान १५% ते ३५%

५. महिलांसाठी ३०% उद्दिष्ट राखीव

६. वय मर्यादा १८ ते ४५ वर्ष, विशेष प्रवर्गासाठी ०५ वर्ष शिथिल

निर्धार १००% रोजगार निर्मितीचा!

अधिक माहिती व संपर्कासाठी :

राज्यस्तरीय संनियंत्रण :
विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय,
नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

SCAN ME

हेल्पलाईन नंबर : १८६०२३३२०२८/०२२ - २२६२३६१/०२२-२२६२२३२२.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा)
जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)

संकेतस्थळ
www.maitri.mahaonline.gov.in
www.di.maharashtra.gov.in

# TELEPHONE LIST OF GENERAL MANAGERS OF ALL DISTRICT INDUSTRIES CENTRES

| S.No. | District | Name of the Officer | STD | Office Tel. No. | Mobile | E-mail ID |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Thane | Shri. A. T Patil | 022 | 25822013 / 25833565 | 9930410922 | didic.thane@maharashtra.gov.in |
| 2 | Raigad | Shri G.S. Haralayya | 02141 | 222099 | 8652517033 | didic.raigad@maharashtra.gov.in |
| 3 | Ratnagiri | Smt. Vidya Kulkarni | 02352 | 222254 / 224829 | 9923454925 | didic.ratnagiri@maharashtra.gov.in |
| 4 | Sindhudurg | Shri. S.S. Damle | 02362 | 228705 / 228662 | 8080379097 | didic.sindhudurg@maharashtra.gov.in |
| 5 | Palghar | Smt. V.B. Sone | 02525 | 252060 | 9975512984 | didic.palghar@maharashtra.gov.in |
| 6 | Pune | Shri P.D. Rendalkar | 020 | 25537541 / 9587/7966 | 9822285518 | didic.pune@maharashtra.gov.in |
| 7 | Satara | Shri Dandgavhal | 02162 | 244655 / 248500(P) | 8668943430 | didic.satara@maharashtra.gov.in |
| 8 | Sangli | Shri S.S. Gawali | 0233 | 2672526/2670762 (P) | 8087582821 | didic.sangli@maharashtra.gov.in |
| 9 | Solapur | Shri. S.P. Kolte | 0217 | 2605232/2605052 | 9923424752 | didic.solapur@maharashtra.gov.in |
| 10 | Kolhapur | Shri S.D. Shelke | 0231 | 2655438/2667805(P) | 9423839512 | didic.kolhapur@maharashtra.gov.in |
| 11 | Nagpur | Shri. S.S. Muddamwar | 0712 | 2564842/2565974 | 8668744384 | didic.nagpur@maharashtra.gov.in |
| 12 | Wardha | Smt. S.V. Bawankule | 07152 | 243463 | 9423681254 | didic.wardha@maharashtra.gov.in |
| 13 | Bhandara | Shri. H.K. Badar (Adl) | 07184 | 252347 | 9422812549 | didic.bhandara@maharashtra.gov.in |
| 14 | Gondia | Shri. H.K. Badar | 07182 | 251443 | 9422812549 | didic.gondia@maharashtra.gov.in |
| 15 | Chandrapur | Shri. Swapnil Rathod | 07172 | 252208 | 9970472479 | didic.chandrapur@maharashtra.gov.in |
| 16 | Gadchiroli | Shri. Swapnil Rathod (Adl) | 07132 | 222717 | 9970472479 | didic.gadchiroli@maharashtra.gov.in |
| 17 | Amravati | Shri. Muddamwar (Adl) | 0721 | 2662644 | 8668744384 | didic.amravati@maharashtra.gov.in |
| 18 | Akola | Shri Nilesh Nikam (Adl) | 0724 | 2430880 | 9730435754 | didic.akola@maharashtra.gov.in |
| 19 | Buldhana | Shri Sunil Patil (Adl) | 07262 | 242367 / 244564 | 7588616768/ 8766654257 | didic.buldhana@maharashtra.gov.in |
| 20 | Washim | Shri Khambayat (Adl) | 07252 | 235708 | 7719028679/ 8421115831 | didic.washim@maharashtra.gov.in |
| 21 | Yavatmal | Shri Nilesh Nikam | 07232 | 244022 | 9730435754 | didic.yavatmal@maharashtra.gov.in |
| 22 | Nashik | Shri. D. K. Shivdas | 0253 | 2350735 | 8308607671 | didic.nashik@maharashtra.gov.in |
| 23 | Jalgaon | Shri Chetan Patil | 0257 | 2255260, 2252832 | 9604901139 | didic.jalgaon@maharashtra.gov.in |
| 24 | Ahmednagar | Shri. V. R. Yande (Addl) | 0241 | 2355342, 2326615 | | didic.ahmednagar@maharashtra.gov.in |
| 25 | Dhule | Shri U.K. Sangle | 02562 | 245009, 245008 | 9420634050 | didic.dhule@maharashtra.gov.in |
| 26 | Nandurbar | Shri U.K. Sangle (Addl) | 02564 | 210048,210055 | 9420634050 | didic.nandurbar@maharashtra.gov.in |
| 27 | Aurangabad | Shri Kiran Jadhav (Addl.) | 0240 | 2330691-2331136 | 9561320533 | didicaurangabad@maharashtra.gov.in |
| 28 | Jalna | Smt. Karuna Kharat | 02442 | 222285-225183 | 9764898127 | didicjalna@maharashtra.gov.in |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 29 | Beed | Shri Tandale (Addl) | 02482 | 220985-220207 | 7721804777 | didicbeed@maharashtra.gov.in |
| 30 | Osmanabad | Shri P.D. Hanbar (Addl.) | 02472 | 222226-224872 | 9604530230 | didicosmanabad@maharashtra.gov.in |
| 31 | Latur | Shri P.D. Hanbar | 02382 | 220853-222654 | 9604530230 | didiclatur@maharashtra.gov.in |
| 32 | Nanded | Shri N.B. Kolekar | 02462 | 250056-255696 / 9049168115 | 9960687492 | didicnanded@maharashtra.gov.in |
| 33 | Parbhani | Shri P.D. Hanbar (Addl.) | 02452 | 223447-226163 | 9604530230 | didicparbhani@maharashtra.gov.in |
| 34 | Hingoli | Shri S. A. Rahim Kadari (Addl.) | 02456 | 222218 | | didichingoli@maharashtra.gov.in |

# TELEPHONE LIST OF REGIONAL JOINT DIRECTORS

| Sr. No. | Region | Name of the Officer | STD | Office Tel. No. | Mobile | E-mail ID |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | **JDI-Konkan** | **Shri S.A. Bhamare** | **022** | **25828504 / 25834880** | **9423447112** | dirokonkan@maharashtra.gov.in |
| | DDI-Konkan | **Smt. S. V. Pawar** | | | **8652208116** | |
| 02 | **JDI-Pune** | **Shri S.S. Surwase** | **020** | **25537332/7369/7729** | **9923911196** | diropune@maharashtra.gov.in |
| | **DDI-Pune** | **Shri A. N. Sharma** | | | **7620293491** | diropune@gmail.com |
| 03 | **JDI-Nagpur** | **Shri. G.O. Bharti** | **0712** | **2560335 2564212** | **9423662316** | dironagpur@maharashtra.gov.in |
| | **DD-Nagpur** | **Smt. S.V. Bawankule** | | | **9423681254** | |
| 04 | **JDI- Amravati** | **Shri. G.O. Bharti** | **0721** | **2662769** | **9423662316** | diroamravati@maharashtra.gov.in |
| | **DD-Amravati** | **Addl Charge to IO** | | | | |
| 05 | **JDI-Nashik** | **Shri S.G. Rajput** | **0253** | **2350087** | **9822285318** | dironashik@maharashtra.gov.in |
| | **DD-Nashik** | **Shri Shivdas** | | | **8308607671** | |
| 06 | **JDI-Aurangabad** | **Shri B.T. Yashwante** | **0240** | **2331105 / 2331627** | **9422212312** | diroaurangabad@maharashtra.gov.in |
| | **DD-Aurangabad** | **Shri K.V. Jadhav** | | | **9561320533** | |
| 07 | **BMR Office, Chamber, Mumbai** | **Shri K.G. Dekate** | **022** | **25206199 / 25208182** | **9422833957** | didicmumbai@maharashtra.gov.in |
| | **DD BMR** | **Smt. Kirti Jagtap** | **022** | **25206199 / 25208182** | **9657667714** | didicmumbai@maharashtra.gov.in |
| 08 | **SRO Nanded** | **Shri. Nitin Kolekar** | **02462** | **250393** | **9960687492** | dironanded@maharashtra.gov.in |

## जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयातील नोडल अधिका-यांची नावे व संपर्क क्रमांक:

| अ.नु | जिल्हा | अधिका-यांची नावे | कोड | भ्रमणध्वनी | ई.मेल | कार्यालयाचे ठीकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | श्रीम. वि.मु. सिरसाठ | 022 | 25822013 /<br>25833565 | didic.thane@maharashtra.gov.in | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, संकुल इमारत, १ ला मजला, वागळे इस्टेट, ठाणे-४०० ६०४ |
| २ | रायगड | श्री.जी.एस. हरळया | 02141 | 222099 | didic.raigad@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, रायगड<br>रायगड बाजारासमोर, रायगड,<br>अलिबाग -४०२२०१ |
| ३ | रत्नागिरी | श्रीम.विद्या कुलकर्णी | 02352 | 222254 /<br>224829 | didic.ratnagiri@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी<br>गटविकास अधिकारी /कर्मचारी निवासामागे, जेल रोड,रत्नागिरी -४१५६१२. |
| ४ | सिंधुदूर्ग | श्री.एस.एस. दामले | 02362 | 228705 /<br>228662 | didic.sindhudurg@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदूर्ग<br>मुख्य प्रशासकिय इमारत, सी ब्लॉक. २ रा मजला, ओरोस (बु.) तालुका कुडाळ जिल्हा सिंधुद्रूर्ग -४१५६१२. |
| ५ | पालघर | श्रीम. व्ही.एम.सोने | 02525 | 252060 | didic.palghar@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, पालघर |
| ६ | पुणे | श्री.पी.डी.रेदांळकर | 020 | 25537541 /<br>9587/7966 | didic.pune@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, पुणे<br>शेतकी महाविद्यालय आवार,<br>शिवाजी नगर,<br>पुणे- ४११ ००५ |
| ७ | सातारा | श्री.दडगवाळ | 02162 | 244655 /<br>248500(P) | didic.satara@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,सातारा<br>प्लॅट नंबर अ १३, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभाग,<br>सातारा -४३१ ००४ |
| ८ | सांगली | श्री.एस.एस.गवळी | 0233 | 2672526/26<br>70762 (P) | didic.sangli@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली<br>शहर भुमापन क्र. ३००/२,<br>उद्योग भवन, विश्रामबाग,<br>सांगली - ४१६२४६ |
| ९ | सोलापूर | श्री.एस.पी.कोलते | 0217 | 2605232/26<br>05052 | didic.solapur@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र- सोलापूर<br>होटगी रोड, कीनारा हॉटेल समोर,सोलापूर -४१३००३. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | कोल्हापूर | श्री.ए.टी.पाटील | 0231 | 2655438/2667805(P) | didic.kolhapur@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र- कोल्हापूर<br>२५४/बी, असेंब्ली रोड, उद्योग भवन,<br>पहिला मजला,<br>कोल्हापूर -४१६००८ |
| ११ | नागपूर | श्री.जी.ओ.भारती | 0712 | 2564842/2565974 | didic.nagpur@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर<br>सिव्हील लाईन्स,<br>उद्योग भवन दुसरा मजला,<br>नागपूर -४४०००१. |
| १२ | वर्धा | श्रीम.के.पी.जैन | 07152 | 243463 | didic.wardha@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा<br>जिल्हाधिकारी कार्यालया जवळ,बॅचलर रोड, वर्धा - ४२२००१ |
| १३ | भंडारा | श्री. एच.के.बदर | 07184 | 252347 | didic.bhandara@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा<br>तहसिल कार्यालाया समोर,<br>भंडारा - ४४१९०४ |
| १४ | गोंदिया | श्री.एच.के.बदर | 07182 | 251443 | didic.gondia@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र ,गोंदिया<br>बीपचे चाळ,तिलक वार्ड, वालामार रोड, गोंदिया - ४४१६१४ |
| १५ | चंद्रपूर | श्री.एस. रोकडे | 07172 | 252208 | didic.chandrapur@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर<br>एस.टि.स्टँड समोर.<br>चंद्रपूर |
| १६ | गडचिरोली | श्री.अे.आर.पवार | 07132 | 222717 | didic.gadchiroli@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,गडचिरोली<br>जिल्हा अधिकारी कार्यालय आवार<br>गडचिरोली -४४२६०६ |
| १७ | अमरावती | श्री.मुदम्मवार | 0721 | 2662644 | didic.amravati@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती<br>अमरावती कँम्प ,<br>अमरावती -४४४६०२ |
| १८ | अकोला | श्री.एन. निकम | 0724 | 2430880 | didic.akola@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, अकोला<br>जुना कापुरा (सती) बाजार,<br>अकोला - ४४४००१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | बुलढाणा | श्री.एस.पाटील | 07262 | 242367 / 244564 | didic.buldhana@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा<br>जतकर भवन, टिळकवाडी बस स्टँड रोड, बुलढाणा-४४३००१ |
| २० | वाशिम | श्री.खंबायत | 07252 | 235708 | didic.washim@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, वाशिम<br>वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, वाशिम |
| २१ | यवतमाळ | श्री.एन. निकम | 07232 | 244022 | didic.yavatmal@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ<br>बांधाना रस्ता,<br>यवतमाळ-५४५००१ |
| २२ | नाशिक | श्री.एस.पाटील | 0253 | 2350735 | didic.nashik@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक<br>औद्योगिक प्रशिक्षण केंद्रा जवळ, त्र्यंबकेश्वर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वसाहत ,सातपूर,<br>नाशिक-४२२००७ |
| २३ | जळगांव | श्री.चेतन पाटील | 0257 | 2255260, 2252832 | didic.jalgaon@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव<br>शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयासमोर,<br>राष्ट्रीय महामार्ग, क्र.९, जळगाव - ४२५ ००१ |
| २४ | अहमदनगर | श्री.ए.डी.दवंगे | 0241 | 2355342, 2326615 | didic.ahmednagar@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर, महाराष्ट्र विद्युत मंडळासमोर,<br>अहमदनगर ४१४ ००१ |
| २५ | धुळे | श्री.यु.के.सांगळे | 02562 | 245009, 245008 | didic.dhule@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, धुळे<br>जामनागरी रस्ता,<br>धुळे - ४२४ ००१ |
| २६ | नंदुरबार | श्री.डी.के.शिवदास | 02564 | 210048,210 055 | didic.nandurbar@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार<br>सीटीएस नंबर ३८३, बाहेरपुरा सत्यम हॉस्पीटल, हाट दरवाजा,नंदुरबार- ४२५ ४१२ |
| २७ | औरंगाबाद | श्रीम.करुणा खरात | 0240 | 2330691-2331136 | didicaurangabad@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,औरंगाबाद<br>हॉलीडे कँप समोर,<br>औरंगाबाद - ४३१००१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | जालना | श्रीम.करुणा खरात | 02442 | 222285-225183 | didicjalna@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,जालना<br>प्लॉट नं.पी-७, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभाग, जालना |
| २९ | बीड | श्री.तांदळे | 02482 | 220985-220207 | didicbeed@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,बीड<br>बसीरगंज - ४३११२३ |
| ३० | उस्मानाबाद | श्री.ए.एस.बळे | 02472 | 222226-224872 | didicosmanabad@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,उस्मानाबाद<br>जिल्हा तुरुंगासमोर<br>उस्मानाबाद - ४३१५०१ |
| ३१ | लातूर | श्री.पी.डी.हणबर | 02382 | 220853-222654 | didiclatur@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,लातूर<br>प्लॉट नं. बी -१, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभाग,<br>लातूर -४१३५२७ |
| ३२ | नांदेड | श्री.ए.यु.इंगळे | 02462 | 250056-255696 / 9049168115 | didicnanded@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड<br>सरकारी औधोगिक वसाहत,<br>शिवाजीनगर,नांदेड |
| ३३ | परभणी | श्री.ए.एस.बळे | 02452 | 223447-226163 | didicparbhani@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,परभणी<br>गोरेगांव जकात नाक्याजवळ,<br>परभणी - ४३१००१ |
| ३४ | हिंगोली | श्री.ए.कादरी | 02456 | 222218 | didichingoli@maharashtra.gov.in | जिल्हा उद्योग केंद्र,हिंगोली<br>शिवाई घर क्र. ७/११, ७/१२,<br>वार्ड क्र. ७, शिवाजी नगर हिंगोली |
| ३५ | मुंबई प्राधिकरण विभाग, | श्रीम.कीर्ती देशमुख | 022 | 25208182/25206199 | didicmumbai@maharashtra.gov.in | विकास सेंटर,७ मजला, बसंत सिनेमा जवळ,चेंबुर पुर्व) मुंबई प्राधिकरण विभाग,मुंबई |

**विभागीय कार्यालयातील नोडल अधिकाऱ्यांची नावे व संपर्क क्रमांक:**

| अ.नु | विभागीय कार्यालये | अधिका-यांची नावे | कोड | भ्रमणध्वनी | ई.मेल | कार्यालयाचे ठीकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोकण विभाग | श्रीम. वि.मु. सिरसाठ | ०२२ | २५८२८५०४/<br>२५८३४८८० | diro.kokan@maharashtra.gov.in | विभागीय कार्यालय, कोकण विभाग, ठाणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, संकुल इमारत, १ ला मजला, वागळे इस्टेट, ठाणे-४०० ६०४ |
| २. | पुणे, विभाग | श्री. के. जी. डेकाटे | ०२० | २५५३७३३२/<br>७३६९७७२९ | diro.pune@maharashtra.gov.in | विभागीय कार्यालय, पुणे, कृषि महाविद्यालय आवार,शिवाजी नगर पुणे-४११ ००५ |
| ३. | नाशिक, विभाग | श्री. एस. जी. राजपूत | ०२५३ | २३५००८७ | diro.nashik@maharashtra.gov.in | विभागीय कार्यालय, नाशिक, औद्योगिक केंद्रा जवळ, सातपूर, नाशिक-४२२००५. |
| ४. | औरंगाबाद विभाग | श्री. बी. टी. यशवंते | ०२४० | २३३११०५/२३<br>३१६२७ | diro.aurangabad@maharashtra.gov.in | विभागीय कार्यालय, औरंगाबाद विकास भवन, ७ वा मजला, अदालत रोड, औरंगाबाद -४३१००१. |
| ५. | नागपूर विभाग | श्री. जी. ओ. भारती | ०७१२ | २५६०३३५/२५<br>६४२१२ | diro.nagpur@maharashtra.gov.in | विभागीय कार्यालय, नागपूर उद्योग भवन, २ रा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४४००१. |
| ६. | अमरावती विभाग | श्री. जी. ओ. भारती | ०७२१ | २६६२७६९ | diro.amravti@maharashtra.gov.in | विभागीय कार्यालय, अमरावती एन.एस.देशमुख बंगला, डॉक्टर आंबेडकर कॉलेजजवळ, नायडू रोड, |